# शिक्षण संचालनालय
## (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
## महाराष्ट्र राज्य
मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra
**DIRECTORATE OF EDUCATION**
(Secondary & Higher Secondary)
**Maharashtra State**
Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1

w'site : education.maharashtra.gov.in    Phone : (020) 2612 0361    e-mail : doecentralize11state@gmail.com


**परिपत्रक-२**

**क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२२/** ४२७८
**दिनांक-१८/०७/२०२२**

18 JUL 2022

**प्रति,**

**विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)**

**विषय- सन.२०२२-२३ मधील इ.११वी प्रवेशासाठी विद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविणे (भाग-२) सुरु करणेबाबत. CAP Option Form + Quota Choices**

**संदर्भ-**
**१.शासन निर्णय पत्र क्र.प्रवेश-०४२२/प्रक्र.४१/एसडी-२ दिनांक.०९/०६/२०२२**
**२.संचालनालयाचे परिपत्रक क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२२/३३०० दि.१९/०५/२०२२**
**३.राज्यस्तर इ.११वी प्रवेश नियंत्रण समिती बैठक दि.१२/०७/२०२२**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, सन.२०२२-२३ मध्ये राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र (MMR) तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहेत. उक्त पाच क्षेत्र वगळता उर्वरित महाराष्ट्रातील प्रवेश स्थानिक परिस्थितीनुसार प्रचलित पद्धतीने केले जातील. त्याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.

**राज्यमंडळाच्या मार्च-२०२२ मध्ये झालेल्या इ.१०वी परीक्षेचा निकाल दि.१७/०६/२०२२ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे आणि त्याची गुणपत्रकेही विद्यार्थ्यांना प्राप्त झालेली आहेत. सबब राज्यातील सन.२०२२-२३ साठी इ.११वी मध्ये प्रवेश देण्याची कार्यवाही सुरु करता येईल. आणखी काही शिक्षण मंडळांचे इ.१०वी परीक्षेचे निकाल येणे अद्याप बाकी आहे. अन्य मंडळांकडून इ.११वी साठी राज्यमंडळाकडे प्रवेश घेण्याचे प्रमाण प्रामुख्याने शहरी भागामध्ये दिसून येते. सबब सन.२०२२-२३ मधी इ.११वी प्रवेशाबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.**

ज्या क्षेत्रामध्ये इ.११वी चे प्रवेश विद्यालय स्तरावरुन Offline केले जातात त्या ग्रामीण भागातील, (भौतिक सुविधांची पडताळणी करुन प्रवेश क्षमता निश्चित करणेची कार्यवाही पूर्ण झालेल्या) कनिष्ठ महाविद्यालयांतील इ.११वी प्रवेश प्रक्रिया सुरु करावी.

ज्या क्षेत्रामध्ये इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने केले जातात सदर ठिकाणची इ.११वी प्रवेश पक्रिया सीबीएसई मंडळाच्या इ.१०वी निकालानंतर सुरु करण्यात येईल. तोपर्यंत भौतिक सुविधांची पडताळणी करुन प्रवेश क्षमता निश्चित करणेची कार्यवाही पूर्ण करावी. केंद्रीय ऑनलाईन प्रवेश क्षेत्रातील इ.११वी प्रवेशाबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

मुंबई महानगर क्षेत्र (MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार असल्याने या शहरांमध्ये राबविण्यात येणाऱ्या इ.११वी प्रवेश प्रक्रियेचीसाठी https://11thadmission.org.in ह्या पोर्टलच्या माध्यमातून प्रवेश अर्जाचा भाग-१ भरण्याची कार्यवाही सुरु आहे; ती यापुढेही सुरु राहील. राज्यमंडळ इ.१०वी परीक्षेचा निकाल जाहीर झालेल्या असल्याने बहुतांश विद्यार्थी अर्जाचा भाग-२ भरण्याची व प्रवेशाच्या फेऱ्या सुरु होण्याची प्रतीक्षा करीत आहेत. सबब, त्यांचा पुढील वेळ वाचवता यावा यासाठी;

ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा भाग-१ पूर्ण केलेला आहे त्यांचेसाठी **पसंतीक्रम देणे अर्थात अर्जाचा भाग-२ Option Form भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.** यामध्ये विद्यार्थ्यांना इ.११वी प्रवेशासाठी आपल्या पसंतीची विद्यालये निवडून त्यांचे पसंतीक्रम/Preferences ऑनलाईन नोंदविता येतील. त्यासोबतच कोटांतर्गत प्रवेशासाठीही पसंतीच्या विद्यालयांमध्ये ऑनलाईन Apply करता येईल. याद्वारे केवळ पसंती नोदविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे प्रत्यक्ष प्रवेशासाठीचे वेळापत्रक सीबीएसई निकालानंतर जाहीर करण्यात येईल. प्रवेश फेरी पूर्वीचे कार्यवाहीचा तपशील सोबत संलग्न आहे.

चालू वर्षी केंद्रीय प्रवेशाच्या (CAP Seats) जागांसाठी अर्जाचा भाग-२ मध्ये पसंतीक्रम देण्यासोबतच कोटांतर्गत जागांवरील (Quota Seats) प्रवेशासाठी ऑनलाईन Apply करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे कोटांतर्गत प्रवेशासाठी ऑनलाईन Apply केलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यालयांना दर्शविण्यात येईल व त्यानुसार गुणवत्तेनुसार कोटा प्रवेश देणे विद्यालयांना सुलभ होईल. सध्या केवळ Apply करता येईल, प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाहीसाठी वेळापत्रक नंतर देण्यात येईल.

CAP जागांसाठी **अर्ज भाग-२ मध्ये विद्यार्थ्यांना किमान एक व कमाल दहा विद्यालयांसाठी पसंतीक्रम** नोंदविता येतील व अर्ज लॉक करणे आवश्यक असेल. कोटांतर्गत प्रवेश ऐच्छिक असलेने त्यासाठी अशी कोणतीही सक्ती असणार नाही.

प्रवेशासाठी फेरीद्वारे विद्यालय/ Allotment देणे तसेच मिळालेल्या विद्यालयात (कोटा प्रवेशासह) प्रवेश निश्चित करणे याबाबत तपशीलवार वेळापत्रक सीबीएसई निकालानंतर देण्यात येईल.

**CBSE मंडळाच्या इ.१०वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरण्यासाठी निकालानंतर पुरेसा वेळ देण्यात येईल, त्यानंतरच प्रत्यक्ष प्रवेश फेरी सुरु करण्यात येईल.**

भाग-२ मध्ये CAP Seats साठी Preferences तसेच Quota Seats साठी Choices भरल्यानंतर त्यापुढील प्रवेश प्रक्रियेचे टप्पे तसेच प्रवेश फेऱ्यांचे नियमांबाबत जागृती करण्यात यावी, त्याबाबत तपशील प्रवेश प्रक्रियेच्या माहितीपुस्तिकेमध्ये देण्यात आलेला आहे. सदर Information Booklet सर्वांसाठी प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर उपलब्ध आहे, ते इंग्रजी व मराठी द्विभाषिक स्वरुपात देण्यात आलेले आहे. याबाबत सर्व संबंधितांना अवगत करावे.

**अर्ज भाग-२ कार्यवाही दिनांक-२२/०७/२०२२ पासून सुरु होत आहे (सोबत तपशील)**

**पुणे,**
**दिनांक-१८/०७/२०२२**

**(महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**

शिक्षण संचालनालय (मायमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३**

(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)

# पसंती अर्ज भाग-२ भरण्याचे वेळापत्रक

**(पसंतीक्रम व कोटा पसंती नोदविणे)**

| क्र | दिनांक व वेळ | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| * | दि.२२-०७-२०२२ पासून सुरु | १. केंद्रीय प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे, म्हणजे नियमित फेरी-१ साठी पसंती अर्ज भाग-२ ऑनलाईन सादर करणे.<br>विद्यार्थ्यांना भाग-२ मध्ये किमान एक व कमाल १० पसंतीक्रम / विद्यालये नोदविता येतील.<br>२. कोटांतर्गत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पसंती नोंदविणे सुरु होईल. (Apply for Quota)<br>पसंतीक्रम अर्ज भाग-२ भरल्यानंतर तो लॉक करणे विसरु नका<br>----------<br>३. नवीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, अर्ज भाग-१ भरून तो प्रमाणित करुन घेणे सुरु राहील.<br>४.भाग-१ अर्जातील माहिती दुरुस्त करता येईल तथापि दोन्ही अर्ज भाग-१ व भाग-२ लॉक केले असलेची खात्री करावी.<br>५.भाग-१ सत्यापित केलेले विद्यार्थी भाग-२ लगेच भरु शकतात. |
| | | |
| * | CBSE इ.१०वी निकालानंतर | ६. नियमित फेरी-१ साठी अलॉटमेंट व प्रवेशाची कार्यवाही बाबत वेळापत्रक प्रसिद्ध होईल.<br>७.नवीन विद्यार्थ्यांना Student Registration, Application Form Part-१ & Option form Part-२ भरणेसाठी तीन ते चार दिवस वेळ मिळेल आणि त्यानंतर प्रवेश फेरी सुरु होईल. |
| | | |

टीप-

**वरीलप्रमाणे वेळापत्रक केवळ पसंती अर्ज भाग-२ ऑनलाईन भरणेसाठी आहे. प्रत्यक्ष प्रवेशासाठीचे वेळापत्रक सीबीएसई निकालानंतर जाहीर केले जाईल.**

**पुणे,**
**दिनांक-१८/०७/२०२२**

**(महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**

Directorate of Education (Secondary and Higher Secondary) MS, Pune-1

**Std.11th Centralised Online Admission Process 2022-23**

(Mumbai MMR, Pune & Pimpri Chinchwad, Nashik, Amravati, Nagpur Municipal Corporation areas)

## OPTION FORM PART-2 FILLING SCHEDULE

## (CAP & QUOTA SEATS)

| Sr. | Date & Time | Process Details | |
|---|---|---|---|
| * | Begins From<br>22-07-2022 | 1. Preference filling i.e. online submission of Option Form Part-2 for Regular Round-1. Students can enroll minimum ONE and maximum TEN Jr. Colleges in the Oprion Form for CAP Seats.<br>2. Choices filling for Quota Seats - Students can apply online for Quota also starts (Apply for Quota)<br>After filling the Option Form Part-2 do not forget to lock it<br>----------------------------------------------------------<br>3. For new students Online Student Registration, filling the application form part-1 and getting it validated will continue<br>4. The information in Part-1 application can be edited but ensure that both the forms Part-1 and Part-2 are locked.<br>5. Candidates who have verified Part-1 can fill Part-2 immediately. | |
| | | | |
| * | After CBSE 10th<br>Result. | 6. Schedule regarding allotment and admission procedure for regular round-1 will be released thereafter.<br>7. New Students will get three to four days to fill Application Form Part-1 & Option form Part-2 and after that the admission round will start. | |
| | | | |

**NB:-**

**The schedule above is only for online filling of Part-II (Preferences & Choices). The schedule for actual admission will be announced after the CBSE result.**

**Pune,**
**Dt.18/07/2022**

**(Mahesh Palkar)**
**Director of Education**
**(Secondary & Higher Secondary)**